13 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



नागाव : येथील गणितायण लॅबचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी .टी. शिर्के, महानंदा घुगे, दीपक शेटे, सुभाष चौगले, एकनाथ आंबोकर आदींच्या हस्ते झाले.

# गणितायन लॅब नवसंजीवनी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; नागाव येथे उद्‌घाटन

नागाव, ता. १२ : डॉ. दीपक शेटे यांनी दुर्मिळ मापनाच्या विविध संग्रहातून नव्या पिढीला मापनाचा इतिहास कळावा, या दृष्टीने उभारलेली गणितायन लॅब नवसंजीवनीच आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

नागाव (ता. हातकणंगले) येथे सुमारे ३००० पेक्षा जास्त मापने असलेल्या गणितायन लॅंबच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे सचिव सुभाष चौगले, शिक्षणाधिकारी डॉ. एकनाथ आंबोकर, गणिततज्ज्ञ विलास आंबोळे, सुधाकर तोडकर, प्राचार्या महानंदा घुगरे हे प्रमुख उपस्थित होते.

सुभाष चौगले, डॉ. आंबोकर यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी शैक्षणिक व्यासपीठाचे अध्यक्ष सर्जेराव लाड, शिवाजी विद्यापीठाच्या गणित विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एच. ठकार, प्रा. डॉ. शिवाजी साबळे, सुजाता शेटे, विजय गायकवाड, सदाशिव दान्नवर, महादेव दान्नवर आदी उपस्थित होते. राजेंद्र पिस्टे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विवेक शेटे यांनी आभार मानले.

13 MAR 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण भविष्याचा वेध घेणारे व्यक्तीमत्व

## शिवाजी विद्यापीठ आयोजित व्याख्यानात डॉ. अंबादास मोहिते यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सहकार, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्र असेल अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याची छाप उमटवली. संयमी, धीरोदात्त, गुणग्राहकता, उत्तम प्रशासक आणि भविष्याचा वेध घेणारे त्यांचे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान आहे. पुरोगामी, सुसंस्कृत आणि विकसित महाराष्ट्राची पायाभरणी यशवंतरावांनी केली, असे प्रतिपादन अमरावती येथील महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स संघटनेचे संस्थापक डॉ. अंबादास मोहिते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव चव्हाण' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.. डॉ. अंबादास मोहिते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थी व प्राध्यापक

डॉ. अंबादास मोहिते म्हणाले, आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करताना राज्याची भविष्यकालीन वाटचाल सुखकर होईल, हे त्यांनी जाणीवपूर्वक पाहिले. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मदतीने सहकार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया महाराष्ट्रात रूजविला. सहकार क्षेत्राला कायद्याचे आणि संस्थात्मक स्वरूप दिले. त्यांच्या कार्यकाळामध्ये १८ सहकारी साखर कारखाने सुरू झाले.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, व्यवस्थापनाची जोड फक्त पुस्तकी नसून माणसाच्या कार्य कर्तृत्वामध्येही असते, हे यशवंतराव चव्हाण यांनी दाखवून दिलेले आहे.

डॉ. नितीन माळी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. यशवंतराव चव्हाण अध्यासनाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले.





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. अंबादास मोहिते. सोबत डॉ. नितीन माळी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के , डॉ. उमेश गडेकर**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2024
सकाळ

# यशवंतराव चव्हाणांनी विविध क्षेत्रांत नेतृत्व फुलवले

## डॉ. मोहिते : विद्यापीठात दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन

कोल्हापूर, ता. १२ : 'महाराष्ट्राचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान आहे. पुरोगामी, सुसंस्कृत आणि विकसित महाराष्ट्राची पायाभरणी यशवंतरावांनी केली. त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये माणसे तयार केली, नेतृत्व फुलवले. त्यातून महाराष्ट्र साकार झाला', असे प्रतिपादन अमरावती येथील महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अंबादास मोहिते यांनी केले.



डॉ. अंबादास मोहिते

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटतर्फे 'महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव चव्हाण' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. मोहिते म्हणाले, 'विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये यशवंतराव चव्हाण यांचा मोलाचा वाटा आणि पुढाकार होता. विरोधकांनी टीका केली तरी त्यांच्या मतांचा आदर व सन्मान ते करीत होते.'

डॉ. नितीन माळी यांनी स्वागत केले. डॉ. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले. दरम्यान, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मिळ छायाचित्रांच्या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद लाभला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

13 MAR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण यांच्याकडून पुरोगामी महाराष्ट्राची पायाभरणी

## डॉ. अंबादास मोहिते : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान आहे. पुरोगामी, सुसंस्कृत व विकसित महाराष्ट्राची पायाभरणी यशवंतराव चव्हाण यांनी केली, असे प्रतिपादन अमरावती येथील डॉ. अंबादास मोहिते यांनी केले.

विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्या वतीने 'महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव चव्हाण' या विषयावर अमरावती येथील महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अंबादास मोहिते यांचे व्याख्यान झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. डॉ. मोहिते म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये यशवंतराव चव्हाण यांचा मोलाचा वाटा आणि



शिवाजी विद्यापीठातून

पुढाकार होता. आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करताना राज्याची भविष्यकालीन वाटचाल कशी सुखकर होईल हे त्यांनी जाणीवपूर्वक पाहिले. त्यांच्यावर महात्मा गांधी, शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता. या प्रगल्भ वैचारिक बैठकीतूनच त्यांनी महाराष्ट्राला नवीन दिशा दिली. यशवंतरावांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये माणसे तयार केली, नेतृत्त्व फुलवले.

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मदतीने सहकार व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया महाराष्ट्रात रूजविला. सहकार क्षेत्राला कायद्याचे आणि संस्थात्मक स्वरूप देण्याचे काम त्यांनी केले. योग्य व्यक्तींची, योग्य वेळी, योग्य ठिकाणी निवड करणे हे यशवंतराव चव्हाणांच्या उत्तम प्रशासनाचे सूत्र होते. महाराष्ट्रात पंचायत राज्य व्यवस्था अधिक मजबूतपणे रूजवण्याचे श्रेय यशवंतराव चव्हाण यांना जाते.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, व्यवस्थापनाची जोड फक्त पुस्तकी नसून माणसाच्या कार्य कर्तृत्वामध्येही असते, हे यशवंतराव चव्हाण यांनी दाखवून दिले आहे. त्यांचे विचार समजावून घेऊन आचरणात आणले पाहिजे. सुरुवातीला यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. यशवंतराव चव्हाण अध्यासनाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. कविता वड्राळे आदी उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात रंगीबेरंगी कीटकांची दुनिया!

## ४५० प्रजातींच्या २,२०० कीटकांचा समावेश; पहिल्यांदाच प्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने ४५० प्रजातींच्या तब्बल २,२०० कीटकांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने लहान-मोठ्या रंगीबेरंगी कीटकांची दुनिया पाहायला मिळणार आहे.



प्राणीशास्त्र विभागात होणाऱ्या कीटक प्रदर्शनाचे बुधवारी सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत उद्‍घाटन होणार आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. बी. खरबडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अन्नसाखळीत कीटकांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. निसर्गाच्या समतोलासाठी कीटक हा उपयुक्त प्राणी आहे. विविध प्रजातींचे असंख्य कीटक आढळतात. या घटकाविषयी माहिती व्हावी, यासाठी प्रदर्शन भरविण्यात आल्याचे प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. ए. देशमुख, समन्वयक प्रा. डॉ. एस. एम. गायकवाड यांनी सांगितले.

विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागात १३ ते १५ मार्चदरम्यान कीटक प्रदर्शन भरविण्यात आले आहे. सकाळी १०.३० ते ६ या वेळेत हे प्रदर्शन खुले असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात आजपासून कीटक प्रदर्शन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने दि. १३ ते १५ मार्च या कालावधीत जिल्ह्यातील पहिलेच कीटक प्रदर्शन आयोजित केले आहे. रोज सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ या वेळेत प्रदर्शन पाहण्यासाठी खुले असेल. कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीमध्ये दि. १३ रोजी प्रदर्शनाचे उद्घाटन होईल. या माध्यमातून फुलपाखरू, मधमाशी, मुंगी, पतंग, डास, रेशीम किडा अशा लहान कीटकवर्गाच्या विविध ४५० प्रजातीच्या तब्बल २२०० कीटकांना कोल्हापूरकरांना पाहता येणार आहे.

कीटक सर्वत्र आढळणारा प्राणी. त्यांचा सतत आजूबाजूला वावर असतो. काही कीटक अवतीभोवती असतात, तर काही दूरवर असतातत. जगभरात कीटकांच्या असंख्य प्रजाती आहेत. त्यांची संख्याही मोठी. आकाराने लहान, दिसायला रंगीबेरंगी अशी कीटकांची दुनिया आश्चर्यकारक अशी आहे. यामध्ये कीटक प्रजातीतील सर्वात मोठा पतंग, सर्वात लहान कीटक, सर्वात मोठा कीटक असणार आहे. राज्य फुलपाखरू, विविध काटीकिडे, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2024
सकाळ

# विद्यापीठात आजपासून उघडणार कीटकांचे दालन

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे बुधवार (ता.१३) ते शुक्रवार (ता. १५) दरम्यान विविध ४५० प्रजातीच्या सुमारे २२०० कीटकांची माहिती देणारे दालन उघडण्यात येणार आहे. या विभागातर्फे तीन दिवस रोज सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा यावेळेत प्रदर्शन आयोजित केले आहे. त्यात कीटक प्रजातीतील सर्वात मोठा पतंग, सर्वात लहान किटक, सर्वात मोठा कीटक असणार आहे. राज्य फुलपाखरु, विविध काटीकीडे, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरिकरे, प्रार्थना कीटक यांचा समावेश आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून कीटकांचा प्रवास उलगडणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवारी सकाळी साडेदहा वाजता कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2024
क्रांतीसिंह

# शिवाजी विद्यापीठात पिकणार मोती

कोल्हापूर(प्रतिनिधी):– अभिनव आणि नवोन्मेषी उपक्रमांना सातत्याने पाठबळ देणारे शिवाजी विद्यापीठ आता खऱ्या खुऱ्या मोत्यांची शेती पिकविण्यास सिद्ध झाले आहे. विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या पुढाकारातून गोड्या पाण्यातील मोती संवर्धन, संशोधन आणि उत्पादन केंद्राचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांना सडोली दुमाला येथील मोती उत्पादक व प्रशिक्षक दिलीप कांबळे यांच्याविषयी माहिती समजल्यानंतर त्यांनी प्राणीशास्त्र अधिविभागाला त्यांच्याशी संपर्क साधून अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्याविषयी चाचपणी करण्याची सूचना केली होती. त्यानुसार आज विद्यापीठात हे मोती पिकविणारे केंद्र कांबळे यांच्याच सहकार्यातून उभे राहिले आहे. विभागातील प्राणीशास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे हे त्याचे समन्वयक म्हणून काम पाहात आहेत.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्राणीशास्त्र विभागातील रेशीम शेतीचा सॉईल टू सिल्क प्रकल्प, फुलपाखरू उद्यान आणि अलिकडच्या काळात सुरू केलेला शोभेच्या मत्स्यउत्पादनाचा प्रकल्प ही याची काही उदाहरणे आहेत. आपल्या विभागातील विद्यार्थी आणि नागरिक यांना सगळे समुद्रीजीव एकाच ठिकाणी पाहता येतील, अशा पद्धतीचे भव्य मत्स्यालय उभारण्याचा मनोदय आहे. आज कार्यान्वित करण्यात आलेले गोड्या पाण्यातील मोत्यांच्या उत्पादन व संशोधनाचे केंद्र हे या मालिकेतील महत्त्वाचे पाऊल आहे.

ही मोत्यांची शेती विद्यापीठ पैशांसाठी करीत नसून ज्ञान संवर्धनासाठी करीत आहे. पर्ल फार्मिंग या विषयाचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश करावा आणि किमान दर वर्षी काही उद्योजक,व्यावसायिक आपल्या विद्यार्थ्यांमधून निर्माण व्हावेत, अशा प्रकारे त्यांना प्रशिक्षित करावे.फ यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. एस.आर. यन्कंची, माधुरी वाळवेकर, सुनील गायकवाड उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2024
तरुण भारत

# कमी वेळेत उत्तरपत्रिका मूल्यमापन मॉडेल सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रमांच्या ६६२ परीक्षांचे निकाल ३० दिवसांत जाहीर केले आहेत. त्यातील बहुतांश निकाल सरासरी १५ दिवसांमध्ये लावले आहेत. विद्यापीठाने कमी वेळेत उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करण्याचे मॉडेल राबवण्यास सुरुवात केली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

ते म्हणाले, भविष्यात शिवाजी विद्यापीठ स्वत:चे एसआरपीडी ॲप तयार करणार आहे. विद्यापीठाने १५ दिवसात लावलेल्या निकालाची दखल राज्य सरकारने घेतली असून शासनस्तरावर या मॉडेलच्या सादरीकरणाच्या सूचना दिल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.